# <u>प्रेस नोट</u> :- दिनांक १०.०९.२०२०

## -: स्थानिक गुन्हे शाखा, सोलापूर ग्रामीण :-

## आंतरराज्य मोटार सायकलची चोरी करणारा आरोपी जेरबंद

## अक्कलकोट, दक्षिण सोलापूर, उत्तर सोलापूर, तुळजापूर, इंदापूर, पुणे, आळंद, गुलबर्गा ( कर्नाटक ) इत्यादी भागातून दुचाकी मोटार सायकलीच्या चोरी करणारा १ सराईत गुन्हेगार यास ताब्यात घेऊन त्यांचे कडुन ११ लाख ४५ हजार रूपये किंमतीच्या २५ दुचाकी मोटार सायकल हस्तगत

---------------------------------------------------------------------------

सोलापूर ग्रामीण जिल्हयातील विविध पोलीस ठाणेच्या विविध हद्दीत दुचाकी मोटार सायकल चोरीच्या गुन्हयांची उकल होण्याच्या अनुषंगाने मा.पोलीस अधीक्षक श्री.मनोज पाटील व मा.अपर पोलीस अधीक्षक श्री. अतुल झेंडे याचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री.अरूण सावंत यांनी स्थागुशा कडील एक विशेष पथक कार्यरत केले होते.

पोनि/अरूण सावंत यांना त्यांचे गोपनीय बातमीदारा मार्फत बातमी मिळाली की, अक्कलकोट दक्षिण पोलीस ठाणे गुरनं ३७७/२०२० भादविक ३७९ प्रमाणे दाखल असलेल्या गुन्हयातील चोरीस गेलेली होंडा सीबी शाईन मोटार सायकल ही इसम नामे **<u>परशुराम शिवाजी मोरे (रा.कलहिप्परगे ता. अक्कलकोट )</u>** यांनी चोरी केली असून तसेच त्याने यापूर्वी वेगवेगळया ठिकाणाहून चोरलेल्या मोटार सायकली हया आळंद, गुलबर्गा व विजापूर या भागात विकल्या असून तो वरील गुन्हयातील बिगर नंबर प्लेट असलेली होंडा सीबी शाईन मोटार सायकल विकणे करीता वागदरी मार्गे आळंद येथे जाणार असल्याची आहे.

मिळालेल्या बातमी प्रमाणे पोनि सावंत यांनी स्थागुशा कडील विशेष पथकातील सपोफौ/ ख्वाजा मुजावर व इतर कर्मचारी यांना बातमी सांगून बातमी प्रमाणे कारवाई करणेबाबत सुचना दिल्या.
त्यावरून सहा. पोलीस उपनिरीक्षक, ख्वाजा मुजावर व त्यांचे पथक मिळालेल्या बातमी प्रमाणे वागदरी येथे जावून सापळा रचला काही वेळानंतर बातमीप्रमाणे अक्कलकोटच्या दिशेने वागदरी गांवाकडे बिगरनंबर प्लेटच्या मो.सा.वर एक इसम येत असल्याचे दिसले. त्याचा संशय आल्याने त्यास वागदरी चौकात येताच गराडा घालून पकडले. पकडलेल्या इसमास त्याचे नांव पत्ता विचारता तो उडवाउडवीची उत्तरे दिली. त्यास विश्वासात घेवून नांव पत्ता विचारले असता त्याने त्याचे नांव **<u>परशुराम शिवाजी मोरे, (वय २५ वर्षे रा. कलहिप्परगे ता. अक्कलकोट )</u>** असे असल्याचे सांगितले. त्याचे जवळ मिळुन आलेल्या होंडा सीबी शाईन मोटार सायकलचे कागदपत्र व लायसन्स आहे अगर कसे याबाबत विचारणा करता त्यांने त्याचेकडे कागदपत्र व लायसन्स नसल्याचे सांगितले तेंव्हा त्याचा व मो.सा. चा अधिक संशय आल्याने त्यास अधिक विश्वासात घेवून त्याचेकडे अधिक विचारपुस केली असता त्याने सांगितले की, सुमारे १५ दिवसापूर्वी करजगी ते कलहिप्परगे जाणारे रोडच्या कडेला लावलेली मो.सा. चोरून आणल्याचे सांगुन ती आळंद जि. गुलबर्गा येथे विकणे करीता जात असल्याचे सांगितले.

त्यानंतर ताब्यात घेतलेल्या इसमास आणखीन विश्वासात घेवून त्याचेकडे सोलापुर जिल्हयातील चोरीस गेलेल्या मो.सा.बाबत विचारपूस केली असता त्याने सांगितले की, मागील ०२ वर्षापासून मी स्वत: सोलापूर शहर, अक्कलकोट, दक्षिण सोलापूर, उत्तर सोलापूर, तुळजापूर, इंदापुर,पुणे, तसेच गुलबर्गा, आळंद रा. कर्नाटका इत्यादी भागातुन दिवसा व रात्रीच्या वेळी हॅन्डल लॉक नसलेल्या मो.सा. चे गाडींच्या स्विच काढून स्विचच्या दोन्ही बाजूस वायरचा तुकडा जोडून डायरेक्ट कनेक्शन करून सदर गाडी चालु करून मोटार सायकली चोरी केल्या आहेत व चोरलेल्या मोटार सायकली हया नातेवाईक, मित्र यांना फायनान्सच्या गाडया लिलावात घेतलेल्या असुन त्याची कागदपत्रे नंतर आणुन देतो असे सांगुन काही गाडया विकल्या आहेत व काही गाडया गहाण ठेवल्या आहेत तसेच काही गाडया वापरण्यास दिल्या असले बाबत सांगितले .

**किणी ता. अक्कलकोट, किणी सुलतान ता. आळंद जि. गुलबर्गा, कोराळी ता. आळंद, गुलबर्गा शहर, आलमेल ता. सिंदगी, होर्ती ता. इंडी, तडवळ ता. अक्कलकोट,जेऊरवाडी ता. अ.कोट इत्यादी ठिकाणाहून एकूण ११ लाख ४५ हजार रूपये किंमतीच्या एकूण २५ दुचाकी मोटार सायकल हस्तगत आलेल्या आहेत.**

ताब्यात घेतलेल्या संशयीत आरोपी याचेकडुन चोरीच्या विकलेल्या / गहान ठेवलेल्या अनुक्रमे

०७ होंडा सीबी शाईन,
०६ हिरो स्प्लेंडर,
०५ क्लासिक बुलेट,
०२ एचएफ डिलक्स,
०१ होंडा युनिकॉर्न,
०१ बजाज पल्सर,
०२ पॅशन प्रो,
०१ टीव्हिएस एक्सल १००,

असे एकूण ११ लाख ४५ हजार रूपये किंमतीच्या एकूण २५ दुचाकी मोटार सायकल हस्तगत केल्या आहेत. ताब्यात घेतलेला इसम व हस्तगत करण्यात आलेल्या २५ दुचाकी मोटार सायकली हया पुढील कार्यवाहीसाठी अक्कलकोट दक्षिण पोलीस ठाणेच्या ताब्यात दिले आहे.

| सोलापूर जिल्हयातील | |
|---|---|
| सोलापूर तालुका | 01 |
| अ.कोट उत्तर | 02 |
| अ.कोट दक्षिण | 03 |
| वळसंग | 02 |
| एम.आय.डी.सी पो.ठाणे | 02 |
| जोडभावी पो.ठाणे | 01 |
| एकूण | 11 |

| बाहेरील जिल्हा व राज्य | |
|---|---|
| पुणे जिल्हा | 06 |
| उस्मानाबाद | 03 |
| कर्नाटक राज्य | 05 |
| एकूण | 14 |
| | |
| | |
| | |

**सदर ताब्यात घेतलेला आरोपी नामे परशुराम शिवाजी मोरे ( वय २५ वर्ष रा.कलहिप्परगे ता. अक्कलकोट ) याचे विरुध्द**
**अक्कलकोट दक्षिण पो.ठाणे,**
**वळसंग पो.ठाणे**
**विजापूर (कर्नाटक) जिल्हयातील गांधी चौक पोलीस ठाणे,**
**ठाणे शहर येथील कोनगाव पोलीस ठाणेस चोरीचे गुन्हे दाखल असून तो गुन्हयात पाहिजे असलेला आरोपी आहे.**

**याव्दारे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, ज्यांच्या वरील कंपनीच्या दुचाकी मोटार सायकल हया चोरीस गेलेल्या आहेत अशा नागरिकांनी त्याचे कडील वाहनाचे कागदपत्रासह अक्कलकोट दक्षिण पोलीस ठाणेस संपर्क साधणेस विनंती आहे.**

सदरची कामगिरी मा.पोलीस अधीक्षक श्री.मनोज पाटील, मा.अपर पोलीस अधीक्षक, सोलापूर ग्रामीण श्री.अतुल झेंडे यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री.अरूण सावंत यांचे नेतृत्वाखाली सहा.पोलीस उपनिरीक्षक ख्वाजा मुजावर, पोहवा/नारायण गोलेकर, दिलीप राऊत, मोहन मनसावाले, पोकॉ/अक्षय दळवी, पांडुरंग केंद्रे, विलास पारधी यांनी बजावली आहे.

-- oo --